# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१ mail :pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-६६ दिनांक:- १९/०३/२०२१

## ३ किलो १७८ ग्रॅम वजनाचा गांजा अंमली पदार्थ काशिमीरा पोलीस ठाणे गुन्हेप्रकटीकरण शाखेकडुन जप्त

दिनांक १७/०३/२०२१ रोजी २१.५५ वा. सुमारास काशिमीरा पोलीस ठाणेचे सहा.पोलीस निरीक्षक श्री महेंद्र भामरे यांना गोपनीय बातमीदाराकंडून माहिती मिळाली की, काशिमिरा पोलीस ठाणे हद्दीमध्ये मुंबई अहमदाबाद हायवेवर सर्व्हिस रोडच्या मुंबईकडे जाणाऱ्या वाहिनीवर नायके शोरुमजवळ एक इसम गांजा या अंमली पदार्थाची विक्री करण्याकरीता येणार आहे. त्याबाबत वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री संजय हजारे, काशिमिरा पोलीस ठाणे यांना सांगुन त्यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि श्री महेंद्र भामरे व त्यांचे पथकाने मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी शोएब किराणा स्टोअर्सच्या समोर सापळा रचुन छापा कारवाई केली असता एक विधीसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेतले. त्याचे कब्जातुन ३१,७८० रुपये किंमतीचा ३ किलो १७८ ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमलीपदार्थ जप्त करण्यात आला असून त्याबाबत काशिमिरा पोलीस ठाणे गु र नं २३२/२०२१ एन.डी.पी.एस.ॲक्ट १९८५ कलम ८(क) ,२०(ब),२९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विधीसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेण्यात आले असून गुन्हयातील इतर पाहिजे दोन आरोपीचा पोलीस शोध घेत आहेत.

सदरची कारवाई श्री अमित काळे, पोलीस उपआयुक्त,परिमंडळ-०१, श्री विलास सानप, सहा. पोलीस आयुक्त, मिरा रोड विभाग, वपोनि/श्री संजय हजारे, पोनि/जितेद्रं पाटील (गुन्हे), काशिमिरा पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक श्री महेंद्र भामरे, पोलीस उपनिरीक्षक श्री धनजंय गायकवाड, पोशि/शरद नलावडे, पोशि/संतोष तायडे, पोशि/स्वप्नील मोहिले, पोशि/सचिन मोरे व पथकाने केली आहे.